# जिल्हा परिषद,अमरावती

जिप/क्रमाक/मुकाअ/स्विस/ 08 /17
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
दिनांक 7 मार्च 2017

**कार्यालयीन आदेश**:-

वृत्तपत्रातुन प्रसिध्द झालेल्या बातम्यांचे खंडण करणे तसेच जि.प.ने केलेल्या वैशिष्टयपूर्ण कामाकाजाला प्रसिध्दी देणेसाठी जनसंपर्क समन्वयक(P.R.Coordinatior) म्हणून कामकाज हाताळणेबाबत......

जिल्हा परिषद,अमरावती अंतर्गत विविध विभाग तसेच तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावरील कामकाजाबाबत,अडचणी,समस्या,तक्रारींबाबत वृत्तपत्रातून सातत्याने बातम्या प्रसिध्द होत असतात.सदर बातमीची वस्तुस्थिती तपासून संबंधित वृत्तपत्रांकडे खंडण करणेसाठी पाठविण्याच्या सूचना यापूर्वीच शासनाचे परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.याबाबत विभागस्तरावर मा.विभागीय आयुक्त यांचेकडुन वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो.

तसेच जि.प.अंतर्गत विविध विभागांनी केलेल्या प्रगतीपथावर आणि वैशिष्टयपूर्ण उपक्रमांना वृत्तपत्रातून प्रसिध्दी देणेसाठी,जि.प.च्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून वृत्तपत्रातून माहिती देण्याची कार्यवाही सुरु आहे. आता,यासाठी जनसंपर्क समन्वयक (P.R.Co-ordinator) म्हणून जवाबदारी सोपविण्याची बाब विचाराधीन होती.यासाठी आता महिला बाल कल्याण विभागाच्या, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेच्या जिल्हा समन्वयक कु.क्षिप्रा मानकर यांचेकडे अतिरिक्त जवाबदारी सोपविण्यात येत आहे.त्यांनी त्यांचे नेहमीचे काम सांभाळून जनसंपर्क समन्वयकाचे कामकाज पहावयाचे आहे.

जनसंपर्क समन्वयक म्हणून त्यांचेकडे खालील जवाबदारी सोपविण्यात येत आहे.

1. विविध दैनिक वृत्तपत्रातून जि.प.यंत्रणेशी संबंधित प्रसिध्द झालेल्या विपरीत बातमीचे खंडण करण्यासाठी,सर्वप्रथम सदर बातमी खातेप्रमुख-गटविकास अधिकारी व्हॉट्सअॅप (Whatsapp) ग्रुपवर अनुपालनासाठी अपलोड करण्यात यावी.
2. विषयाशी संबंधित यंत्रणेच्या प्रमुखांकडुन तीन दिवसात वस्तुस्थितीबाबत अहवाल प्राप्त

करुन घेणेसाठी पाठपुरावा करावा.

3. विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन प्राप्त झालेल्या बातमीचे अनुपालन संबंधित कार्यालयाने सदरचा खुलासा मा.विभागीय आयुक्त तसेच संबंधित वृत्तपत्राकडे पाठविला गेला किंवा नाही याबाबतची खात्री करावी.यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ लिपीक श्री.पराग सोनुने यांची मदत घ्यावी.
4. मुकाअ कार्यालयाकडुन तसेच जि.प./प.स.विभागांकडुन करण्यात येत असलेल्या नाविण्यपूर्ण /वैशिष्टयपूर्ण तसेच प्रगतीपथावरील उपक्रमांची माहिती मुकाअ यांचे सहमतीने वृत्तपत्रांकडे प्रसिध्दीसाठी देणे.
5. तसेच आवश्यकतेनुसार मुकाअ यांचे मान्यतेने पत्रकारांना माहिती देणेसाठी सहकार्य करणे.

(डॉ.किरण कुलकर्णी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

पतिलिपी:-

1. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती.
2. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.अमरावती.
3. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) जि.प.अमरावती.
4. जि.प.खाते प्रमुख सर्व
5. माहिती तंत्रज्ञान कक्ष,साप्रवि जि.प.अमरावती.
6. कु.क्षिप्रा मानकर जिल्हा समन्वयक, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, मबाक जि.प. यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.
7. गट विकास अधिकारी प.स.सर्व